अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# प्रेम, कर्तव्याचे संवर्धन रक्षाबंधन

संस्कृती केव्हा टिकते ज्यावेळेला तिचा प्रकृतीशी प्रवृत्तीशी घनिष्ट संबंध असतो. भारतीय संस्कृती ही जगातली एकमेव अशी संस्कृती असावी की त्यामध्ये प्रकृती आणि प्रवृत्ती यांचा संबंध जपला गेलेला दिसून येतो. प्रकृती म्हणजे निसर्ग आणि प्रवृत्ती म्हणजे व्यक्ती किंवा समाजाची राहण्याबोलण्या किंवा वागण्याची अथवा व्यवहाराची रीत म्हणता येईल. या संस्कृतीची अभ्यासकांनी ऋषीमुनींनी प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यासाठी तपश्चर्या करून काही निष्कर्ष सिध्द केले.आणि त्यातूनच या संस्कृतीचा विकास होत गेला. जवळपास वर्षाच्या बाराही महिन्यांमध्ये वेगवेगळ्या निमित्तांना औचित्याचा अलंकार घालून संस्कारांचा एक दीपस्तंभ त्यांनी निर्माण केला आणि आज त्या दीपस्तंभाच्या प्रकाशातच समाजाची किंवा व्यक्तीची वाटचाल चालू आहे. आजचे रक्षाबंधन हा केवळ एक सण नाही तर अशाच प्रकृती आणि प्रवृत्तीच्या संवर्धनाचे एक प्रभावी औचित्य आहे. अतिशय छोट्या आणि साध्या गोष्टीतून मोठा तत्त्वविचार मांडला गेला. एक साधा सुताचा धागा बहिणीने भावाच्या हाताला बांधायचा, या साध्या वाटणाऱ्या प्रक्रियेतही केवढा मोठा सात्विक आणि संपन्न विचार किंवा व्यवहार दडलेला आहे, हे आपल्या लक्षात येत नाही. बहिणीने भावाकडे आपल्या रक्षणाची मागणी करावी एवढ्याच केवळ शरणागत प्रवृत्तीचे ते निमित्त नाही. तर बहिणीने भावामधला पुरुषार्थ जागा करण्याची, त्याला त्याच्या कर्तव्याचे स्मरण करून देण्याचे काम या छोट्याशा गोष्टीतून झालेले दिसून येते. म्हणूनच रक्षाबंधन किंवा राखीपौर्णिमा हे संस्कृतीसंवर्धनाचे तितकेच प्रभावी माध्यम आहे. अगदी पुराणकालापासून ते अर्वाचिन प्राचीन इतिहासातल्या घटनांमध्ये बहिणीने किंवा पत्नीने पतीला अशा प्रकारचे 'रक्षासूत्र' बांधल्याच्या घटना ऐकायला मिळतात. अगदी बळीराजाला लक्ष्मीने सुताचा धागा बांधण्यापासून ते अगदी अलीकडच्या काळात इतिहासातल्या घटनांमध्ये युध्दासाठी किंवा पराक्रमासाठी निघालेल्या राजांना, सरदारांना किंवा सैनिकांना राखी बांधली जाते. आजच्या आधुनिक काळात बहीणभावाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून हा राखीपौर्णिमेचा उत्सव अधिक लोकप्रिय झालेला दिसून येतो. या सर्वांचा मूळ हेतू कर्तव्य जबाबदारी आणि प्रेम या तीनही गुणांचे संवर्धन आणि संरक्षण हे लक्षात घेतले पाहिजे. कारण मनुष्याचा स्वभाव असा असतो की त्याला सुखाच्या लालसेमध्ये कर्तव्याचा किंवा जबाबदारीचा लवकर विसर पडतो. किंबहुना त्याला त्याचे भान राहात नाही. आपण सुख उपभोगत असताना हे वाटून घ्यावे किंवा इतरांपर्यंतही ते पोहचवावे.अशी जबाबदारीसुध्दा आपल्याकडून पाळली जात नाही. या सगळ्या गोष्टींचे स्मरण करून देणारा हा खरे तर उत्सव म्हटला पाहिजे.

## पूर्णत्वाची प्रचिती

सणांचा प्रवृत्तीशी आणि प्रकृतीशी कसा संबंध आहे, हे राखीपौर्णिमेच्या निमित्तातून अधिक स्पष्ट होते. किंबहुना भारतीय संस्कृतीचे काही सण हे पौर्णिमेला आलेले दिसून येतात. चंद्र हा मनाची देवता मानली जाते आणि तो पौर्णिमेला पूर्ण आकारात पहायला मिळतो. कोणत्याही गोष्टीचे पूर्णत्व हेच समाधानाचेही कारण असते आणि म्हणूनच एखाद्या गोष्टीच्या पूर्णत्वाची प्रचिती घेण्यासाठी निसर्गातल्या या घटनेचा भारतीय संस्कृतीत वापर करून घेतला गेला. भावाबहिणींमधल्या प्रेमाला पूर्णत्वाचा आकार देण्यासाठी श्रावणशुध्द पौर्णिमा नक्की केली गेली. विशेष म्हणजे त्याच दिवशी नारळीपौर्णिमा येते. जो समुद्र अनेक कारणांनी व्यक्तीचे आणि सृष्टीचे संवर्धन करतो त्या समुद्राविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे काम याच श्रावण पौर्णिमेला केले जाते. समुद्रानेच दिलेले श्रीफळ किंवा नारळ त्यालाच अर्पण करून एक कृतज्ञतेचा भाव निर्माण केला गेला. यावरूनच प्रकृती म्हणजे निसर्ग आणि माणसाच्या प्रवृत्तीचा संबंध यानिमित्ताने जोडला गेला.कर्तव्याचे, जबाबदारीचे भान जागवण्याचे काम यानिमित्ताने झाले.श्रावण पौर्णिमेचा दिवस देशाच्या अनेक भागात 'संस्कृत दिन' म्हणूनही पाळला जातो. यादिवशी प्राचीन काळी विद्याभ्यासाला सुरुवात होत असे आणि गळ्यामध्ये सुताचा धागा किंवा यज्ञोपवित धारण करून या शिक्षणाचा 'श्रीगणेशा' होत असे. म्हणजेच श्रावणपौर्णिमेला हे तीनही निमित्त एकत्र करून संस्कृतीचे संचित जपण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या सर्व गोष्टी सहजासहजी किंवा काळाच्या ओघात लक्षात येत नाहीत. परंतु त्यामागचे उद्देश समजून घेतले तर आपण एका केवढ्या मोठ्या जीवनविचाराचे पाईक आहोत, याची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. याचा जर अधिक सखोलपणे विचार केला तर आपली सामाजिक परिस्थिती अधिक चांगली होऊ शकते. कारण हे सण किंवा उत्सव सामाजिक सुव्यवस्थेचाच एक भाग असतात. हे तर आजच्या मानसशास्त्रातलासुध्दा मान्य करावे लागेल. की सण आणि मानवी मन याचा संबंध संस्कृतीच्या माध्यमातून जोडला गेला आणि त्यामुळेच जगातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या असताना 'भारतीय संस्कृती' मात्र टिकून राहिली.

## आजची सामाजिक उणीव

दुर्दैवाने काळाच्या ओघामध्ये सणांचा मूळ हेतू बाजूला पडत गेला.आणि त्याला काही प्रमाणात फॅशनचेही स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. राखी पौर्णिमेच्या निमित्ताने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाठवले जाणारे संदेश हा अशाच एका फॅशनचा भाग ठरतो. काळाबरोबर या गोष्टी जरी बदलणाऱ्या असल्या तरी मूळ हेतूला धक्का लागता कामा नये. कारण या सणाचा प्रवृत्तीशी थेट संबंध आहे. विकृतीच्या विळख्यात सापडणारी माणसाची प्रवृत्ती ताळ्यावर ठेवण्याचे काम यानिमित्ताने होते. समाजातल्या स्त्रीवर्गाकडे बहिणीच्या नात्याने पाहण्याची दृष्टी या सणातून दिली गेली. स्त्री विषयीचा आदर वाढण्याचा प्रयत्न याच माध्यमातून केला गेला. एवढेच नव्हे तर समाजातली एकता टिकवण्यासाठीसुध्दा एकमेकांना राखी बांधून 'बंधुभाव' जपण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो. परंतु आज महिलांवरील वाढत जाणारे अत्याचार बघितल्यानंतर या सणांचा जो प्रभाव दिसायला हवा किंवा जाणवायला हवा, तसा तो नाही आणि ही 'प्रवृत्ती' वेगाने 'विकृती'ची बळी ठरत आहे. केवळ मोह आणि आकर्षण याच्यामागे धावण्याची ही स्पर्धा कोणतेही नियम किंवा बंधन स्वीकारायला तयार दिसत नाही. ही उणीव लक्षात घेतली तर रक्षाबंधनासारख्या सणांची सामाजिक जाणीव कशी गरजेची आहे, हे अधोरेखित होते.